MHKO100010352012

**नियमीत दिवाणी दावा क्र. १९०/२०१२**

दत्तू जेधे म.वा. वगैरे.
विरुध्द
रामू कांबळे म.वा. वगैरे.

**निशाणी क्र. ७२ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा दावा मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण होऊन मिळणेकरीता व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी वादीतर्फे साक्षीदार क्र.२ संदिप शंकरराव कागवाडे यांचा सरतपास निशाणी क्र.६४ अन्वये घेण्यात आला. त्यानंतर, प्रतिवादी यांना संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतला नाही. त्यानंतर, प्रतिवादी व वकील यांचा वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर राहिलेने व उलटतपास न घेतल्याने दिनांक १९/१२/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला होता. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता ब-याच काळापासून प्रलंबीत आहे. त्याबाबत प्रतिवादी यांनी ते परगावी राहण्याकरीता असल्याने मे. न्यायालयात हजर राहता आले नाही, तसेच प्रतिवादी यांचे वकील त्यांच्या महत्वाच्या कामासाठी गावी गेलेमुळे त्यांना मे. न्यायालयात हजर राहून उलटतपास घेता आला नाही असे कारण नमुद केलेले आहे. परंतु, प्रकरणाची परिस्थिती व नमुद कारण पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली काढणेकरीता प्रतिवादी यांना बचावाची संधी देणेदेखील योग्य वाटते. प्रतिवादी यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे वादी यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत साक्षीदार यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

सही/-
**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २२/०२/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 22/02/2024 |
| Order signed by P.O. on | 22/02/2024 |
| Order uploaded on | 22/02/2024 |